## नि.क्र.१७ वरील आदेश

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा वारस अभिलेखावर घेण्याकरीता व दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरिता दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ चे विधीज्ञांनी सदर अर्जास हरकत घेतली आहे. प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचे विरुद्व सदर अर्जास म्हणणे नाही असा आदेश पारित करण्यात आला आहे.

३. वादी व प्रतिवादीचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

४. वादीने सदर दावा प्रतिवादी विरुध्द वाटपाकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये वादीचे कथन असे की, प्रतिवादी नं. २ ही वादी व प्रतिवादी क्र. १, ३ ते ४ यांची आई असून ती मयत झाली आहे. वादी व प्रतिवादी क्र. १, ३, ४ हे मयत प्रतिवादी क्र. २ चे वारस असल्याने त्या अनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे. प्रतिवादी तर्फे सदर अर्ज मुदतीत नसल्याने नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

५. याठिकाणी हे नमूद करणे जरुरीचे की, अर्ज नि.क्र. १९ वरील आदेशाप्रमाणे प्रतिवादी क्र. २ विरुद्व पारित झालेला अवसान आदेश रद्दबातल करण्यात आला असून प्रतिवादी क्र. २ यांचे वारस अभिलेखावर घेण्याकरीता झालेला विलंब माफ करण्यात आला आहे.

६. सदर प्रकरणामध्ये प्रस्तुत अर्ज प्रलंबित असताना वादीचे विधीज्ञांनी नि.क्र. १९ वरील आदेशाप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्तीबाबत कोणताही आदेश पारित झाला नसताना दाव्यामध्ये दुरुस्ती केली आहे. तसेच दावा दुरुस्तप्रत देखील दाखल केली आहे. सदर प्रकरणामध्ये प्रक्रियेची व त्याचे टप्प्याची गुंतागुंत निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत सदर प्रक्रियेतील तांत्रिक दोष दूर करणे आवश्यक आहे. निर्विवादपणे वादी व प्रतिवादी क्र. १, ३ व ४ हे मयत प्रतिवादी क्र. २ चे वारस आहेत. तसेच वादीने शपथपत्रासह कथन केले आहे की, वादी व प्रतिवादी क्र. १, ३, ४ यांचे व्यतिरिक्त मयत प्रतिवादी क्र. २ चे ईतर कोणतेही वारस नाहीत. अशा परिस्थितीत सदर अर्जामध्ये वादीने मागणी केलेली दुरुस्ती मंजूर करणे उचित होईल. सबब खालील आदेश पारित करण्यात आला.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जात नमूद केल्याप्रमाणे वादीतर्फे मूळ दाव्यामध्ये केलेली दुरुस्ती अभिलेखावर सामिल करुन घेण्यात आली.

HARSHADA UMATAI UTTAM PATIL
Digitally signed by HARSHADA UMATAI UTTAM PATIL
Date: 2024.07.11 17:38:38 +0530

(श्रीमती एच.यु.यु.पाटील)

दिनांक – १०/०७/२०२४. ४थे सह दि.न्या.क.स्तर, बार्शी.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S.V. Kokate (Grade III) |
| (b) | Court | : | Smt. H.U.U.Patil,<br>$4^{th}$ Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 10/07/2024 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 11/07/2024 |